# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 10 June 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १० जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्णतेवर लक्ष केंद्रित केल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- नमो ॲपवर जन-मन सर्वेक्षणात पहिल्याच दिवशी देशभरातून पाच लाखाहून अधिक प्रतिक्रिया
- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

आणि

- देशातल्या पहिल्या जलपर्यटन प्रकल्पाची सिंधुदुर्ग जिल्ह्यात निवती इथं मुहूर्तमेढ

****

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रासह इतर सर्व क्षेत्रात लक्षणीय बदल झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. वस्त्रोद्योग, क्रीडा, संरक्षण अशा विविध क्षेत्रातल्या प्रगतीबाबत भाष्य करत, देशानं आधुनिकीकरण आणि संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर लक्ष केंद्रित केलं असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या अकरा वर्षात भारताच्या संरक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन झालं आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही म्हटलं आहे. देश संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होणाकडे वाटचाल करत असल्याचं संरक्षणमंत्र्यांनी आपल्या याबाबतच्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

गेल्या ११ वर्षात देशानं लक्षणीय प्रगतीचा काळ आणि सुशासन अनुभवलं असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं

आहे. ते आज मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळा संदर्भात पुद्दुचेरी इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

****

मोदी सरकारची अकरा वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं नमो ॲपवर सुरू करण्यात आलेल्या जन-मन सर्वेक्षणात पहिल्याच दिवशी देशभरातून पाच लाखाहून जास्त लोकांच्या प्रतिक्रिया प्राप्त झाल्या आहेत. भारताच्या विकास यात्रेच्या या सर्वेक्षणात सामील होण्याचं आवाहन पंतप्रधानांनी काल देशवासियांना केलं होतं. पहिल्याच दिवशी आलेल्या इतक्या प्रतिक्रिया पाहता, हा मंच सरकारला लोकांशी जोडणारं महत्त्वपूर्ण माध्यम ठरल्याचं दिसून येतं, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

गेल्या ११ वर्षात सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्वांच्या माध्यमातून देशातल्या नागरिकांच्या जीवनमानात आमुलाग्र परिवर्तन घडून आलं आहे. सर्वच प्रमुख क्षेत्रांत झालेल्या बदलांचा आढावा आकाशवाणी आपल्या श्रोत्यांसाठी घेऊन येत आहे. आजच्या भागात आपण संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेविषयी जाणून घेणार आहोत.

***गेल्या दशकात, देशाचे सुरक्षा धोरण स्पष्टता, दृढनिश्चय आणि आत्मविश्वासने भरलेले आहे. २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईकपासून ते २०२५ मधील ऑपरेशन सिंदूरपर्यंतच्या सर्व मोहिमांतून, आपल्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका सहन करणार नाही, हा स्पष्ट संदेशच भारतानं दिला आहे.***

***ऑपरेशन सिंदूर- हा भारताच्या दहशतवादविरोधी मोहिमेतला अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. एका अचूक, समन्वित मोहिमेच्या माध्यमातून सीमेपलीकडे असलेल्या नऊ दहशतवादी तळांना निष्क्रिय करण्यात आलं. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला दिलेलं हे जलद आणि निर्णायक प्रत्युत्तर होतं.***

***ऑपरेशन सिंदूरच्या यशात स्वदेशी उत्पादनांची महत्त्वाची भूमिका आहे. या मोहिमेत रणनीतीचं अंमलबजावणीत अचूक रूपांतर करण्यात आलं. सध्या आपण संरक्षण क्षेत्रात विमानवाहू नौका आयएनएस विक्रांतपासून ते अतिशय उंचीवरील हलक्या लढाऊ***

***हेलिकॉप्टरपर्यंत, आत्मविश्वासानं सर्व बाबींची पूर्तता करत आहोत. इनोव्हेशन्स फॉर डिफेन्स एक्सलन्स, आयडीईएक्स सारखे उपक्रम स्टार्टअप्स, तसंच सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आपल्या सैन्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना देण्यासाठी प्रेरित करत आहेत.***
***देशाची संरक्षण निर्यात विक्रमी २३ हजार ६२२ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. २०१४ पासून ही वाढ ३४ पट झाली आहे. पाच हजारांहून अधिक वस्तू आता सकारात्मक स्वदेशीकरणाच्या यादीत आहेत आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संरक्षण क्षेत्रासाठीच्या भांडवलापैकी ७५ टक्के रक्कम देशांतर्गत उत्पादनासाठी राखून ठेवण्यात आली आहे.***

***....हर्षवर्धन दिक्षीत, आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर***

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकाच्या ११ वर्षांचा कार्यकाळ हा, आत्मनिर्भर भारत ते विकसित भारताच्या संकल्पाकडून सिद्धीकडे जाण्याचा कार्यकाळ असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाचं वर्णन, पारदर्शी प्रामाणिकता आणि प्रचंड गतिशीलतेचं निर्णयक्षम सरकार असं करावं लागेल, असं सांगत, केंद्र सरकारच्या सहकार्यानं महाराष्ट्रात पायाभूत सुविधांची सहा लाख कोटी रुपयांची कामं सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

****

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्याचा, तसंच आगामी विधिमंडळ अधिवेशनात यासंदर्भात विधेयक आणण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.
राज्यातल्या शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात सव्वासहा हजार रुपयांची तर पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात दहा हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं आज घेतला. याशिवाय, बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनाही आठ हजार रुपये विद्यावेतन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीनं उपाययोजनेचा, तसंच विविध प्रकारच्या दरांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. याशिवाय, महाराष्ट्र मेड लिकर- MML, हा धान्याधारित विदेशी मद्याचा नवीन प्रकार तयार करण्यास आज मान्यता देण्यात आली, फक्त महाराष्ट्रातले मद्य उत्पादकच असं उत्पादन करू शकतील.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदं आणि पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदं, अशा १ हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती इथं समुद्र तळाशी स्थापित होणाऱ्या देशातल्या पहिल्या जलपर्यटन प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली. या प्रकल्पामुळे सागरी संवर्धन तसंच पर्यटनाला चालना मिळणार आहे. केंद्र सरकारने यासाठी नौदलाचे आयएनएस गुलदार निवृत्त जहाज हे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे सोपवलं आहे.

****

येत्या २१ जून रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या योग अभ्यासक आणि ज्येष्ठ प्रशिक्षक डॉ चारुलता रोजेकर यांनी दिलेली, जानुशिरासन या आसनाविषयीची माहिती आज आपण जाणून घेऊया –

**बाईट – डॉ चारुलता रोजेकर, योग अभ्यासक आणि ज्येष्ठ प्रशिक्षक**

****

छत्रपती संभाजीनगर इथले युवा उद्योजक अमित कुलकर्णी यांनी केंद्र सरकारच्या स्टार्टअप योजनेचा लाभ घेत, अन्नप्रक्रिया उद्योग उभारला आहे. आपल्या या प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून देशविदेशात अंकुरित कडधान्यांची निर्यात करत असल्याचं, अमित कुलकर्णी यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – अमित कुलकर्णी, युवा उद्योजक**

****

वट पौर्णिमेचा सण आज साजरा केला जात आहे. लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत वडाची पन्नास रोपं लावून, महिलांनी या रोपांचं पूजन

करून वटपौर्णिमा साजरी केली. वटपौर्णिमेचं औचित्य साधून प्रत्येक कुटुंबानं किमान दहा झाडं लावावीत, असं आवाहन वर्षा ठाकूर घुगे यांनी यावेळी केलं.

✻✻✻✻

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सह व्यवस्थापकीय संचालकपदी बदली झाली आहे. याबाबतचा आदेश आज जारी करण्यात आला.

✻✻✻✻